लोकमत

## साहित्य अकादमीचे सचिव के. श्रीनिवास राव यांची 'लोकमत'ला विशेष मुलाखत

# 'पुरस्कार वापसी'च्या पलीकडेही अकादमीची ओळख

नितीन नायगांवकर।
लोकमत न्यूज नेटवर्क

नवी दिल्ली : 'साहित्य क्षेत्रातील नव्या पिढीची गरज ओळखून स्वत:ला बदलण्याचा अकादमी प्रयत्न करतेय. अकादमीची ओळख 'पुरस्कार वापसी'च्या पलीकडेही आहे, हे सिद्ध करणारे अनेक उपक्रम आम्ही सातत्याने राबवतोय. देशाच्या शेवटच्या टोकावरील साहित्यिक आणि अकादमी यांच्यातील दरी दूर करण्यात मोठ्या प्रमाणात यश मिळत आहे,' असे स्पष्ट मत साहित्य अकादमीचे सचिव के. श्रीनिवास राव यांनी 'लोकमत'ला दिलेल्या विशेष मुलाखतीत व्यक्त केले. मुंबईमध्ये वायरिंगचे काम करणारा कामगार ते साहित्य अकादमीचा सचिव असा अफलातून प्रवास करणारे के. श्रीनिवास राव यांनी गेल्या काही वर्षांत उपक्रमांमध्ये दुपटीने वाढ केली आहे. साहित्यातील सर्व घटकांना सामावून घेण्याचा ते प्रामाणिक प्रयत्न करीत आहेत.

### संडे स्पेशल मुलाखत



***साहित्यिक व अकादमी यांच्यातील दरी दूर का होऊ शकली नाही?***

ही दरी आजही काही प्रमाणात आहे, हे मान्य आहे. पण ती दूर करण्याचा प्रयत्नच झाला नाही असे म्हणता येणार नाही. २०१३ मध्ये मी पदभार स्वीकारल्यानंतर साहित्य क्षेत्रातील नव्या पिढीची गरज ओळखून स्वत:ला बदलण्याचा अकादमी प्रयत्न करतेय. अकादमीची ओळख केवळ 'पुरस्कार वापसी'पुरता मर्यादित नाही. महात्मा गांधी यांनी 'खेड्यांकडे चला' असा संदेश दिला. त्यादृष्टीने आम्ही दोन वर्षांपूर्वी 'ग्रामालोक' हा उपक्रम सुरु केला. सोलापूरमधील चपळगावमध्ये त्याचे उद्घाटन झाले आणि आतापर्यंत देशातील अडीचशे गावांमध्ये हा कार्यक्रम झाला. यात खेड्यांमधील साहित्यिकांना आम्ही व्यासपीठ देत असतो. साहित्य अकादमीचे अस्तित्व देशाच्या प्रत्येक भागात जाणवायला हवे, यासाठी प्रयत्न करतोय.

***अकादमी स्थापन करण्याचा उद्देश साध्य होतोय का?***

देशाच्या कानाकोपऱ्यात सकस लेखन करणारा साहित्यिक वर्ग मोठ्या प्रमाणात आहे. त्यांना अकादमीच्या निमित्ताने एका धाग्यात बांधण्याचा आणि राष्ट्रीय व्यासपीठावर ओळख प्राप्त करुन देण्याचा स्थापनेमागे उद्देश होता. भाषा, बोली यात कुठेही भेद न करता काम सुरु झाले. अकादमीचे पहिले अध्यक्ष पं. जवाहरलाल नेहरु यांच्यासह त्यावेळचे आणि त्यानंतरचे सर्व पदाधिकारी या उद्दिष्टांवर काम करीत आले. ते आमच्यासाठी आव्हानात्मक आहे, अशक्य मुळीच नाही. हा उद्देश पूर्णपणे साध्य झाला, असाही दावा मी करणार नाही. पण प्रयत्नच होत नाहीत, असे म्हणणे चकीचे ठरेल.

***तरीही अकादमी बुद्धिजीवींपुरता मर्यादित आहे, अशी भावना का आहे?***

असा विचार कुणी करीत असेल तर ते पूर्णपणे चुकीचे आहे. काही प्रमाणात ही भावना साहित्यिकांच्या मनात असेलही, पण आता तसा विचार करण्याची गरज नाही. पूर्वी वर्षाला तीनशे कार्यक्रम व्हायचे आणि आज सहाशेपेक्षा अधिक उपक्रम होतात. तेही देशाच्या सर्व भागांमध्ये होतात. दिल्लीपुरता आम्ही मर्यादित नाही. 'युवसाहिती', 'पूर्वोत्तरी', 'नारी चेतना' यासारखे कार्यक्रम देशभर होतात. तरीही आपल्याला संधी मिळत नाही, असे कुणाला वाटत असेल तर त्यांनी अकादमीला थेट पत्र व परिचय पाठवावे. आम्ही त्यांची दखल घेऊ.

***अकादमीच्या कार्यक्रमांमध्ये विशिष्ट अंतराने तेच साहित्यिक दिसतात, हा आरोप कितपत खरा आहे?***

मला असे मुळीच वाटत नाही. बरेचदा आम्हाला त्या त्या भागांमधील लोकप्रिय व ज्येष्ठ साहित्यिकांची मदत घ्यावी लागते. पण, प्रत्येकवेळी तेच लोक व्यासपीठावर राहणार नाहीत, याचीही आम्ही खबरदारी घेतो. उलट त्याच लोकांच्या माध्यमातून आम्ही नवनव्या लेखक-कवींना व्यासपीठ देण्याचा प्रयत्न करतो. अकादमीच्या मुंबई प्रादेशिक कार्यालयांतर्गत महाराष्ट्र, गुजरात, गोवा हे तीन राज्य आणि मराठी, कोकणी, सिंधी व गुजराती या चार भाषा येतात. देशातील २४ भाषांना अकादमीने सामावून घेतले आहे. प्रत्येक भाषेतील नवोदित लेखक-कवी आज आमच्याशी जुळलेले आहेत. पुरस्कार निवड समिती आणि भाषा सल्लागार समितीतील सदस्यांचा सर्वसमावेशक दृष्टिकोन यात महत्त्वाचा ठरतो.

New Delhi
Page No. 3 Oct 20, 2019
Powered by: erelego.com